

### मुंबई-नागपूर सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे प्रकल्पात सहभागी होण्यास

# मलेशियन कंपन्या उत्सुक

**मुंबई :** राज्याच्या प्रगतीला अधिक गती देणाऱ्या मुंबई-नागपूर सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे' प्रकल्पासह सर्वांसाठी घरे' आणि पोलिसांसाठीच्या घरांच्या प्रकल्पात सहभागी होण्यास मलेशियन कंपन्यांच्या शिष्टमंडळाने गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन उत्सुकता दाखविली.

सह्याद्री अतिथीगृह येथे मलेशियन कंपनी सीआयडीबी होर्डिंगचे चेअरमन दातो श्री यांच्या नेतृत्वाखाली विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी खासदार पूनम महाजन, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव प्रवीण परदेशी, विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, राज्यात जनतेला पायाभूत सुविधा पुरविणारे अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरु करण्यात येत असून या प्रकल्पांमध्ये विदेशातील अनेक कंपन्यांनी गुंतवणूक करण्यास उत्सुकता दाखविलेली आहे. मुंबई-नागपूर सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे' या प्रकल्पामुळे राज्याचा चेहरामोहरा बदलणार असून हा प्रकल्प देशातील सर्वात मोठा आर्थिक कॉरिडॉर असणार आहे. या एक्सप्रेस वे' चा फायदा राज्यातील २२ जिल्ह्यांना होणार असून या मार्गावरील शहरे विकसित होणार आहेत. यामुळे या प्रकल्पात गुंतवणूक करण्याची विविध कंपन्यांना मोठी संधी निर्माण होणार आहेत. राज्यातील विविध प्रकल्पांमध्ये सहभागी होणाऱ्या कंपन्यांना राज्य शासन सर्वोतोपरी मदत करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी शिष्टमंडळास दिली.

मलेशियातील अलोय एमटीडी, डीएमआयए ग्रुप, इव्हरसेंदाई यासारख्या विविध कंपन्यांनी मुंबई-नागपूर सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे, सर्वांसाठी घरे, पोलिसांसाठी घरे या प्रकल्पांमध्ये काम करण्यास उत्सुक असल्याचे संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी यावेळी मुख्यमंत्र्यांना सांगितले.

# महापालिका निवडणूक: प्रभाग ४ सदस्यांचाच

**पुणे :** आगामी महापालिका निवडणुकीसाठी राज्य सरकारने चार सदस्यांचा एक प्रभाग करण्याचा अध्यादेश प्रसिद्ध केला आहे. आज त्याचे तपशील जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला. वरिष्ठ प्रशासकीय सूत्रांनीही या निर्णयाला दुजोरा दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीन महिन्यांपूर्वीच त्याचे सूतोवाच पुण्यात केले होते. याबाबतचा आदेश शासकीय राजपत्रात १९ मे रोजी प्रसिद्ध झाला आहे. राजपत्रातील प्रकरण दोनमध्ये महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तिथे चार पालिका सदस्य; परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील,' असे स्पष्ट म्हटले आहे. त्याचबरोबर प्रत्येक मतदाराला त्याच्या प्रभागातील निवडून द्यायच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल, असेही नमूद करण्यात आले आहे. या अध्यादेशाची पुढील प्रकरणे नगरपालिकांमध्ये अध्यक्ष थेट मतदारांमधून निवडून देण्याच्या बदलासंबंधीची आहेत. हा अध्यादेश आम्हाला अद्याप मिळालेला नाही, असे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. मंत्रिमंडळाने नगरपालिकाच्या निवडणुकांमध्ये बदल केला आहे. महापालिकांच्या प्रभागसंख्येतही बदल केल्याचे स्पष्ट होत आहे.

**भाजप आग्रही**

चार सदस्यांच्या प्रभागरचनेसाठी भाजप सुरवातीपासून आग्रही आहे. पुणे महापालिकेत या संदर्भात पालकमंत्री गिरीश बापट यांनी तीन महिन्यांपूर्वी शहरात सर्वेक्षण केले होते. त्यात या पद्धतीच्या रचनेमुळे भाजपला महापालिकेची सत्ता मिळेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. शहरातील आठही आमदारांनी या रचनेला अनुकूलता दर्शवली आहे. या पार्श्वभूमीवर हा निर्णय जाहीर झाला आहे. या निर्णयामुळे राजकीय समीकरणे बदलणार असून, महापालिका निवडणुकीसाठी भाजप-शिवसेना यांची युती; तर काँग्रेस-राष्ट्रवादीची आघाडी होण्याची शक्यता आहे.

# राजन अमेरिकेचे एजंट

### राजन यांच्यावर खासदार डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांचा हल्ला

**नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँक गव्हर्नर रघुराम राजन यांच्यावर नव्याने हल्ला चढवताना खासदार डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना ताबडतोब हाकलावे, अशी मागणी केली आहे. राजन हे अमेरिकेचे एजंट असून जगभरात भारतीय अर्थव्यवस्थेबाबतची गोपनीय व संवेदनशील माहिती पाठवत असल्यासह सहा आरोपही स्वामी यांनी ठेवले आहेत.

मोदी यांना पुन्हा पत्र लिहून राजन यांच्या हकालपट्टीची मागणी करताना स्वामी यांनी आयएमएफचे माजी मुख्य अर्थतज्ज्ञ राजन यांना वाढत्या आणि उच्च व्याजदरांचे विपरीत परिणाम ठाऊक असायला हवे होते. त्यांचे धोरण स्वेच्छापूर्वक आणि राष्ट्रविरोधी हेतूने आहे, असे स्वामी यांनी म्हटले आहे.

देशांतर्गत मंदी लादण्यासाठी राजन यांनी व्याजदर वाढवले, राजन यांच्याकडे अजूनही अमेरिकेचे ग्रीन कार्ड आहे. दरम्यान, राजन यांच्यावर स्वामी यांच्याकडून सातत्याने होत असलेल्या हल्ल्यांवर केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राजन यांच्यावरील हल्ले आपल्याला मान्य नाहीत. कुणावरही वैयक्तिक शेरेबाजी मला मान्य नाही. आरबीआय ही महत्वाची संस्था असून ती तिची मते बनवत असते. तिची मते मान्य नसू शकतात परंतु तो मुद्यांवरील वाद असला पाहिजे, अशा शब्दांत जेटलींनी खडसावले.



# गुजरात भाजपमध्ये अंतर्गत लाथाळ्या

### आनंदीबेन यांचे प्रतिपादन

**अहमदाबाद :** गुजरात भाजपमधील अंतर्गत लाथाळ्यांना वैतागलेल्या मुख्यमंत्री आनंदीबेन पटेल यांनी आज आपल्या मनातील खदखद व्यक्त करत विरोधकांवर जोरदार टीकास्त्रे सोडली. जी मंडळी आज माझे पाय खेचण्याचे काम करत आहे, त्यांचे पाय कसे खेचायचे हे चांगलेच ठाऊक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्या राजकोटमध्ये आयोजित क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. केंद्रातील मोदी सरकारला दोन वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी बोलताना आनंदीबेन म्हणाल्या की, मीपण राजकारणातील मुरलेली खेळाडू आहे. त्यामुळे जी मंडळी माझ्या विरोधात कारस्थान रचत आहेत, त्यांना पायबंद कसा घालायचा, हे मला चांगलेच ठाऊक आहे. दरम्यान आनंदीबेन यांच्या मंत्रिमंडळातीलच काही बड्या नेत्यांनी त्यांच्या नेतृत्त्वाला थेट आव्हान दिल्याचे बोलले जाते.

**मोदी, शहांशी चर्चा**

आसामचे मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्या शपथविधी सोहळ्याप्रसंगी आनंदीबेन पटेल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली होती. गुजरातमध्ये अमित शहांना मानणारा मोठा गट असून, त्या गटानेच आनंदीबेन यांच्या विरोधात कारवाया सुरू केल्याचे बोलले जाते.

# शेतकऱ्यांना १ रुपयात जेवण

**सोलापूर :** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांना एक रुपयात जेवण देण्याच्या योजनेला सुरवात झाली. त्याचे उद्घाटन बाजार समितीचे सभापती दिलीप माने यांच्या हस्ते झाले. बाजार समितीने सुरू केलेल्या या योजनेचा शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.



मागील तीन-चार महिन्यांपूर्वी बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांना एक रुपयात जेवण देण्याचा निर्णय झाला होता. राज्यातील इतर बाजार समित्यांमध्ये सुरू असलेल्या योजनांचा अभ्यास करून ही योजना सुरू करण्यात आली आहे. या वेळी उपसभापती चंद्रकांत खुपसंगे, महापौर सुशीला आबुटे, संचालक शहाजी पवार, चन्नवीर चिट्टे, प्रवीण देशपांडे, सोजर पाटील, गजेंद्र गुंड, नानासाहेब देशमुख, प्रभूराज विभूते, सिद्रामप्पा यारगले, अशोक देवकते, एन. एन. खलिफा, सिद्धाराम चाकोते, राजन जाधव, इंदुमती अलगोंडा, मैनोद्दिन शेख उपस्थित होते. महादेव पाटील यांच्या बनशंकरी महिला बचत गटास हे चालविण्यास दिले आहे.

## राज्यसभेसाठी भाजपचे सहस्रबुद्धे

**(पान १ वरून)** यादी जाहीर केली. यासाठी उद्या (ता.३१ मे) उमेदवारी भरण्याची अखेरची मुदत आहे. पक्षाने आज पाच राज्यांतील सहा उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. यात विनय सहस्रबुद्धे, महात्मे व प्रभू यांची नावे आहेत. ज्येष्ठ पत्रकार एम. जे. अकबर (मध्य प्रदेश), शिवप्रताप शुक्ला (उत्तर प्रदेश) व महेश पोद्दार (झारखंड) यांचीही उमेदवारी जाहीर झाली आहे. नितीन गडकरी यांचे राजकीय सल्लागार म्हणून २०१० मध्ये दिल्लीत आलेले डॉ. सहस्रबुद्धे यांनी गेल्या सहा वर्षांत पक्षाच्या वैचारिक वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**प्रभूंना शिवसेनेचा विरोध :** सुरेश प्रभू यांचे नाव महाराष्ट्रातून आघाडीवर होते. मात्र त्यांच्या नावाला शिवसेनेकडून विरोध झाल्याचे समजते. त्यामुळे संसदीय कामकाजमंत्री वेंकय्या नायडू यांनी आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री व तेलुगू देसमचे नेते चंद्राबाबू नायडू यांच्याशी गेला आठवडाभर सातत्याने चर्चा केली. त्यानंतर स्वतः नायडू राजस्थानातून, तर प्रभू आंध्रमधून उमेदवारी अर्ज भरतील, असा निर्णय घेण्यात आला.

# भुजबळांची प्रकृती स्थिर असल्याचा अहवाल

**मुंबई :** महाराष्ट्र सदन बांधकाम प्रकरणातील गैरव्यवहाराच्या आरोपाखाली अटकेत असलेले माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांची प्रकृती स्थिर आहे, असा अहवाल शुक्रवारी जे. जे. शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञांनी मुंबई उच्च न्यायालयाला दिला. भुजबळ यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी न्यायालयाने ८ जूनपर्यंत तहकूब केल्यामुळे तूर्त त्यांना तुरुंगातच राहावे लागणार आहे. भुजबळ यांना प्रकृतीच्या कारणावरून जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. न्या. शालिनी फणसाळकर जोशी यांच्या खंडपीठापुढे याचिकेवर सुनावणी झाली. जे. जे. रुग्णालयाच्या नऊ डॉक्टरांच्या समितीने भुजबळ यांच्या वैद्यकीय तपासणीचे अहवाल न्यायालयात दाखल केले.

## पान १ वरून

## ग्राहकांवर १५ टक्के सेवाकराचा भुर्दंड

वर्षभरात सेवाकरात झालेली एक टक्का वाढ सामान्यांच्या बजेटवर परिणाम करेल, असे कर विश्लेषकांचे म्हणणे आहे.

**मोबाइल महागणार :** सेवाकरातील वाढ मोबाइल उद्योगाला झटका देणारी आहे. १५ टक्के सेवाकरामुळे मोबाइलच्या किमती वाढणार आहेत. त्याचबरोबर प्रीपेड प्रकारातील ग्राहकांचा वाढीव सेवाकरामुळे टॉकटाइम कमी होईल. पोस्टपेड ग्राहकांच्या मोबाइल बिलामध्ये किमान तीन टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे.

**दागिने खरेदीवरील कर रद्द :** दोन लाख किंवा त्यावरील दागिने खरेदीवरील एक टक्का प्रस्तावित कर केंद्र सरकारेन मंगळवारी रद्द केला. यामुळे सराफ उद्योगाला मोठा दिलासा मिळाला आहे. दोन ते पाच लाखांपर्यंत दागिने खरेदीवर जूनपासून एक टक्का कर लागू केला जाणार होता. मात्र करवाढ, उत्पादन शुल्क आणि पॅनकार्ड सक्ती या मुद्द्यावर सराफ संघटनांनी तब्बल ४२ दिवस आंदोलन केल्याने सरकारने एक टक्का कर रद्द करण्याचा निर्णय घेतला.

## राजधानीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त अभिवादन

यावेळी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

**महाराष्ट्र परिचय केंद्रात अहिल्यादेवींना अभिवादन**

महाराष्ट्र परिचय केंद्रात आयोजित कार्यक्रमात अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करण्यात आले. परिचय केंद्राच्या माहिती अधिकारी अंजू निमसरकर-कांबळे यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. अंजू निमसरकर-कांबळे, कमलेश पाटील आणि एल. बी. शिंदे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या योगदानाबाबत माहिती दिली. यावेळी कार्यालयात आलेल्या अभ्यागतांसह कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

# ..अन् सलमान खान भडकला

**मुंबई :** पार्श्वगायक अरिजीत सिंगकडून अनावधनाने अभिनेता सलमान खान दुखावला गेल्याने अरिजीतने सलमानची जाहीर माफी मागितली आहे. एका कार्यक्रमामध्ये अरजितकडून सलमानचा नकळत अपमान झाल्याने सलमान दुखावला गेला. तो इतका रागावला की त्याने आगामी चित्रपट सुलतान'मधील अरजित सिंगने गायलेले गाणे काढून टाकण्यास सांगितले आहे. ते गाणे दुस-या गायकाकडून गाऊन घ्यावे असंही तो म्हणाला.सलमानला नेमका कशामुळे राग आला, त्या कार्यक्रमात नेमके काय झाले याबाबत कोणताही तपशील देण्यात आलेला



नाही. मात्र, घडलेल्या प्रकारामुळे अरजितने सलमानची माफी मागितली. अरजितने सलमानची फोनवरून तसेच मॅसेजकरूनही माफी मागितली आहे. पण सलमानचा राग शांत झाला नाही. त्याने सोशल नेटवर्कींग साईट फेसबूकवरही त्याची माफी मागितली.

मात्र सलमानचा काहीही उत्तर मिळाले नाही. अखेर अरजितने सलमानला एक पत्र लिहले. त्या कार्यक्रमात जे घडले त्यात तुम्हाला दुखवायचा हेतू नव्हता. मी तुमच्याशी खूप वेळा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण तुमच्याकडून काही उत्तर आले नाही. तरी मी येथे तुमची जाहीरपणे माफी मागतो.

सुलतानचे ते गाणे तुम्हाला दुस-या कोणाकडून गाऊन घ्यायचे असेल तर त्याला माझी काहीच हरकत नाही. फक्त माझ्या आवाजातील गाणे अबाधित राहू द्यावे अशी मी तुम्हाला विनंती करतो, असे अरिजीतने या पत्रात म्हटले आहे. माफी मागणारे पत्रही नंतर अरिजीतने फेसबुकवरून काढून टाकले आहे.